दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ७१ वा गुरूवार दि.१५ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## देशातील सर्व ईडी कार्यालयांना २२ ऑगस्टला काँग्रेस घेराव घालणार



नवी दिल्ली : अमेरिकी शॉर्ट सेलिंग कंपनी 'हिंडेनबर्ग रिसर्च'ने 'सेबी'च्या प्रमुख माधबी पुरी बुच यांचे अदानी समुहाशी असलेल्या व्यावसायिक संबंध उघड केल्याची संयुक्त संसदीय समिती ('जेपीसी') द्वारे चौकशी करण्यात यावी, या मागणीचा पुनरुच्चार करून येत्या २२ ऑगस्टला देशातील सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कार्यालयांना काँग्रेसतर्फे घेराव घालण्यात येणार आहे. काँग्रेसचे महासचिव, प्रभारी व प्रदेशाध्यक्षांची बैठक आज दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेही उपस्थित होते. या बैठकीत नुकताच उघडकीस आलेला हिंडेनबर्ग अहवालाचा मुद्दा चर्चिला गेला. हिंडेनबर्गवरून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घेरण्याचा प्रयत्न काँग्रेसतर्फे केला जाणार आहे. या अहवालाने देशातील सेबीसारखी प्रख्यात नियामक संस्थेने अदानी समुहाशी तडजोड केल्याचे स्पष्ट झाले असून हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादाशिवाय होऊ शकत नाही. या घोटाळ्यात पंतप्रधान मोदी सामील असल्याचे थेट आरोप करण्यात आला. सेबीच्या प्रमुख माधबी पुरी बुच यांचे हितसंबंध गुंतल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना तत्काळ बरखास्त करण्याची मागणी यावेळी काँग्रेसने केली आहे. या बैठकीत संमत झालेल्या ठरावांची माहिती काँग्रेसचे संघटन महासचिव खासदार के.सी. वेणुगोपाल यांनी पत्रकारांना दिली. जातीनिहाय जनगणना व्हावी काँग्रेसच्या आजच्या बैठकीत जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी लावून धरली. गेल्या १३ वर्षांपासून जनगणना झाली नाही. यामुळे अनेकांना आपल्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहावे लागत आहे.असे यावेळी खर्गे यांनी म्हटले आहे.

आरक्षणासाठी समिती गठीत अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण देण्यासाठी क्रिमीलेअरच्या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी काँग्रेस पक्षाने एक समिती गठीत केली आहे.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण

लातूर :- भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिन दिनानिमित्त गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.०५ वाजता



मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होईल. या कार्यक्रमाला सर्वांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. इतर सर्व कार्यालये, संस्था ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास त्यांनी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३५ पूर्वी किंवा सकाळी ९.३५ वाजल्यानंतर ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करावे, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.




## किनवट माहूर तालुक्यातील सरसकट शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मंजूर करा

**आ. भीमराव केराम यांचे कृषीमंत्री धनंजय मुंडेना साकडे**

किनवट/शेख शौकत मागील वर्षी कापूस व सोयाबीन पिकांच्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागले शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टर ५००० रु प्रमाणे अर्थसहाय मंजूर केले परंतु किनवट माहूर विधानसभा मतदार संघातील ५०% पेक्षा जास्त शेतकरी शासनाच्या अर्थसहाय्यापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे सरसकट शेतकऱ्यांना अर्थसहाय मंजूर करण्याबाबत शासन स्तरावरून आदेश व्हावेत असे लेखी निवेदन आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना दिले



मागील वर्षी कापूस व सोयाबीन पिकांच्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागले शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीप पणन हंगाम २०२३- २४ मध्ये शासनाने कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टर ५००० रुपये प्रमाणे अर्थसहाय्य मंजूर केले.शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे लाभार्थी संख्या आहे.

१)कापूस पीक वैयक्तिक लाभार्थी संख्या
किनवट २४,१०५ माहूर ९०६५
२)कापूस पीक सामायिक लाभार्थी संख्या
किनवट ६३४५ माहूर २४४५
३)सोयाबीन पीक वैयक्तिक लाभार्थी संख्या किनवट २०३६१ माहूर ८६६३ ४)सोयाबीन पीक सामायिक लाभार्थी संख्या किनवट ४७१० माहूर १७९६

एकूण लाभार्थी संख्या किनवट ५५५२१ तर माहूर २१९६९ इतकी आहे.

सदर लाभार्थी शेतकऱ्यांचे संमतीपत्र घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे परंतु शासन निर्णयानुसार किनवट माहूर तालुक्यातील ऑनलाईन पीक पेऱ्याची नोंद केलेले ५० टक्क्यापेक्षा अधिक शेतकरी शासनाच्या अर्थसाहयापासून वंचित राहिले आहेत.दरवर्षीच माझ्या किनवट माहूर मतदार संघात नैसर्गिक आपत्तीमुळे खरीप व रब्बी हंगाम पिकाचे अतोनात नुकसान होते.त्यामुळे आर्थिक संकटात असलेल्या किनवट माहूर तालुक्यातील सरसकट शेतकऱ्यांना अर्थसहाय मंजूर करण्याबाबत शासन स्तरावरून आदेश व्हावेत अशी आग्रही मागणी आमदार भीमराव केराम यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे.









## संपादकीय....

# संशयकल्लोळातून सुटका!

अलीकडे एक नवीच चमत्कारिक प्रथा पडून गेलेली दिसते. उदाहरणार्थ नुकतेच पुन्हा चर्चेत आलेले 'हिंडेनबर्ग' प्रकरण आणि त्यात भारतीय भांडवली बाजार नियंत्रक 'सेबी'च्या प्रमुख माधबी पुरी बुच यांच्यावर केले गेलेले आरोप. ते केले अमेरिकी गुंतवणूक कंपनी 'हिंडेनबर्ग'ने. त्यात मुख्य लक्ष्य अदानी समूह. आणि त्या आरोपांचा इन्कार अहमहमिकेने करणार तो मात्र सत्ताधारी भाजप! 'सेबी'च्या प्रमुखांवर जे आरोप झाले त्यांस सामोरे जाण्यास माधबीबाई आणि त्यांचे पती समर्थ आहेत. त्याच वेळी अदानी समूहाच्या समर्थतेबाबत प्रश्नही निर्माण करणे निरर्थक. बरे या दोघांनी आम्हांस या टीकेपासून वाचवा अशी काही मागणी भाजप नेत्यांकडे केल्याचे ऐकिवात नाही. तेव्हा भाजप आणि त्या पक्षाचे समाजमाध्यमी अर्धवटराव यांस या दोघांच्या वतीने इतके उचंबळून येण्याचे काहीही कारण नाही. या संदर्भात पत्रकार परिषदेत माजी कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी केलेला युक्तिवाद त्यांस विनोदवीरांच्या रांगेत बसवू शकेल. ''बघा हिंडेनबर्गच्या या आरोपाने समभाग बाजारावर कुठे काय परिणाम झाला?'' असे विचारत त्यांनी गुंतवणूकदारांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा दावा केला. राजकारण म्हणून हा युक्तिवाद ठीक. पण; एखाद्या विषयाची सत्यासत्यता निश्चित करण्यासाठी बाजारपेठीय चढ-उतारांचा दाखला आपण कधीपासून देऊ लागलो? हे एक आणि दुसरे असे की प्रसाद यांनी आयुर्विमा महामंडळ वा स्टेट बँक ऑफ इंडिया या बलाढ्य सरकारी वित्तसंस्थांनी समभाग बाजारात किती खरेदी केली तेही सांगितल्यास अर्थप्रबोधनास मदत होईल. या सगळ्याचा अर्थ असा की 'हिंडेनबर्ग'च्या ताज्या आरोपांचा विचार करता हे सर्व मुद्दे गौण ठरतात.

कारण अदानींशी संबंधित दोन फंड्समध्ये बुच-दाम्पत्याची गुंतवणूक होती, हे सत्यच 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या मंगळवारच्या वृत्ताने समोर येते. ते नाकारणे माधबीबाई आणि त्यांच्या पतीस शक्य झालेले नाही. अथवा त्यांनी तसा प्रयत्न अद्याप तरी केलेला नाही. त्या वृत्तानुसार, मॉरिशस येथे नोंदल्या गेलेल्या 'आयपीई प्लस फंड १' या उपक्रमात या दम्पतीची गुंतवणूक होती आणि त्यातच गौतम अदानी यांचे ज्येष्ठ बंधू विनोद अदानी यांचेही आर्थिक हितसंबंध होते. प्रश्न इतक्यापुरताच मर्यादित असता तरी हे वास्तव समजून घेता आले असते. पण तसे नाही. हा फंड आणि अन्य अशा १३ वित्तसेवांची चौकशी 'सेबी'मार्फत सुरू असून स्वत:च्याच गुंतवणुकीबाबत स्वत:च बुचबाई चौकशी कशी काय आणि किती निष्पक्षपणे करू शकणार हा यातील कळीचा प्रश्न. म्हणजे महाराष्ट्रात एके काळी सहकारी साखर कारखाने वा तत्सम संस्थांसाठी अर्ज करणारे राजकारणी सत्तेत राहून त्या अर्जांवर निर्णय घेत, तसा हा बुचबाईंचा उद्योग. अद्याप यात त्यांच्यावर अप्रामाणिकपणाचा थेट आरोप झालेला नाही. पण तो होणे फार दूर नाही. कारण हा प्रश्न कायद्यापेक्षाही अधिक औचित्याचा आहे आणि बुच दम्पतीने औचित्यभंग केलेला आहे यात तिळमात्रही शंका नाही. हा सर्व गुंतवणूक तपशील त्यांनी 'सेबी' प्रमुखपदी विराजमान होण्यापूर्वी उघड केला असता, तर त्यांच्या हेतूवर संशय घेण्याची गरज नव्हती. तथापि 'सेबी'चे प्रमुखपद स्वीकारल्यानंतर दोन आठवड्यांनी या सर्वांचा तपशील जाहीर केला. तेव्हा त्यांच्यावर औचित्यभंगाचा ठपका न ठेवता येणे अवघड. त्याची गरज नाही असे अंध जल्पकांस तेवढे वाटू शकते. पण हा जल्पक-वर्ग देश आणि देशाच्या नियमन यंत्रणा चालवत नाही. तेव्हा हे प्रकरण न्यायालयात जाणार नाही याची शाश्वती नाही.

'एक्स्प्रेस'च्या वृत्तातील तपशिलानुसार माधबीबाईंस आपल्या गुंतवणुकीची कबुली (डिस्क्लोजर वा प्रकटन) देण्यासाठी किमान दोन वेळा संधी होती. त्यांनी ती साधली का? तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणी चौकशी करण्यासाठी नंदन निलेकणी आदींची समिती स्थापन करण्यात आली. या समितीसमोर बुचबाईंनी सत्यकथन केले काय? केले असल्यास या समितीने बुच दाम्पत्याच्या हितसंबंधांची माहिती सर्वोच्च न्यायालयास दिली काय? 'सेबी'च्या संचालक मंडळात केंद्रीय वित्त खात्यातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असतो. या सरकारी अधिकाऱ्यांस बुच दम्पतीच्या गुंतवणुकीचा तपशील माहीत होता काय? अदानी समूहात परदेशी नोंदणीकृत विविध १३ वित्तसेवांची चौकशी सुरू आहे. हे अर्थातच बुचबाईंस ठाऊक असणार. तेव्हा या १३ वित्तसेवांचा आणि आपला संबंध काय, हे जाहीर करणे अत्यावश्यक होते. तसे ते नाही असे फक्त अलीकडच्या नवनैतिकतावाद्यांचेच मत असू शकेल. बाजारपेठ आणि भारतीय नियामक यांच्यावरील सामान्य गुंतवणूकदारांच्या विश्वासास तडा जाऊ नये असे सर्वोच्च सत्ताधीशांस वाटत असेल तर या प्रकरणी बुच यांना वगळून चौकशी व्हायला हवी. आपल्या लोकप्रतिनिधींस निवडणुकीत उतरताना स्वत:च्या, नजीकच्या कुटुंबीयांच्या समग्र संपत्तीचे विवरणपत्र उघड करावे लागते. हा नियम बाजारपेठेचे नियंत्रण करणाऱ्यांस का नसावा? माधबीबाई या काही थेट 'सेबी' प्रमुखपदी नेमल्या गेल्या नव्हत्या. 'सेबी'च्या संचालक मंडळाच्या सदस्यपदी त्या आधी नेमल्या गेल्या आणि नंतर त्यांच्याकडे 'सेबी'चे नेतृत्व आले. याचा अर्थ 'सेबी'चे प्रमुखपद येण्याआधी सदस्य असताना त्यांना या संदर्भातील नियम/कायदेकानू- आणि यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे औचित्यभंगाचा धोका- या सगळ्याची जाणीव असणारच असणार. तरीही त्यांनी आवश्यक खबरदारी घेतली नाही असा निष्कर्ष निघू शकतो. तसेच हा सर्वोच्च न्यायालयाचाही विश्वासभंग ठरतो. ''सेबी अदानी प्रकरणाच्या चौकशीसाठी सक्षम आहे'', असे सर्वोच्च न्यायालयाचे मत होते आणि त्यामुळे न्यायालय नियंत्रित चौकशीची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. असे असताना 'सेबी'प्रमुखाचेच गुंतवणूक हितसंबंध अदानी-निगडित वित्तसंस्थांशी आहेत हे सर्वोच्च न्यायालयास लक्षात आले असते तर त्यांनी सर्व चौकशी 'सेबी'हाती ठेवली असती का, हा प्रश्न.

'हिंडेनबर्ग'च्या निमित्ताने हे आणि अन्य असे काही प्रश्न चर्चेस येतील आणि त्यास न्यायालयातही आव्हान दिले जाऊ शकते. अशा वेळी या बुचबाईंच्या मागे किती ताकद उभी करायची याचा विचार केंद्र सरकारला करावा लागेलच लागेल. आज नाही तर उद्या. रविशंकर प्रसाद अथवा कुणा समाजमाध्यमी जल्पकांचे शौर्य, त्यांचा पाठिंबा वगैरे ठीक. पण ते अंतिमत: कामी येणार नाही. शेवटी उपयोगी पडेल तो प्रामाणिकपणा आणि पारदर्शता. काँग्रेसवर बोफोर्स ते दूरसंचार ते कोळसा अशा आघाड्यांवर हल्ला करण्याची संधी न सोडणाऱ्यांनी हा प्रामाणिकपणा आणि पारदर्शता यांस आपण कटिबद्ध असल्याचे दाखवून द्यावे. अन्यथा लोकसभा निवडणुकीतील 'संविधान-बदल प्रयत्नांच्या' आरोपांप्रमाणे हे आरोपही सरकारला चिकटू लागणार, हे निश्चित. ते होणे टाळायचे असेल तर सत्ताधाऱ्यांस आदरणीय मार्गाने या संशयकल्लोळातून सुटका करून घ्यावी लागेल. एरवी राजकारणात 'कथानक निश्चिती'च्या आरोपास काहीही अर्थ नसतो.

# सोन्याचा दर देशभर एकच असू शकतो का? कसा?

सोन्याच्या विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी जेम्स अँड ज्वेलरी कौन्सिल देशभरात 'एक देश एक दर' ('वन नेशन, वन गोल्ड रेट') धोरणावर काम करत आहे. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीनंतर या धोरणाची अधिकृत घोषणा केली जाऊ शकते. तर याच पार्श्वभूमीवर 'एक देश, एक दर' धोरण नेमकं काय आहे? ते देशासाठी किती महत्त्वाचं आहे, ही संकल्पना अस्तित्वात आली तर त्याचे परिणाम काय होतील, या दृष्टिकोनातून या संकल्पनेचा हा आढावा.

'एक देश, एक दर' धोरण काय आहे?

'एक देश, एक दर' धोरणाचे मुख्य उद्दिष्ट देशभरातील सोन्याचे दर प्रमाणित करणं, अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षतेसाठी प्रादेशिक अडथळे दूर करणे आहे. 'एक देश, एक दर' धोरणाचे उद्दिष्ट देशभरात सोन्याचा एकसमान दर प्रस्थापित करणे आहे. त्यामुळे स्थानिक कर आणि बाजार परिस्थितीतील फरकांमुळं निर्माण होणारी प्रादेशिक असमानता दूर होईल. सध्या, विविध कर संरचना आणि स्थानिक मागणी-पुरवठ्यातील चढउतारांमुळं भारतातील सोन्याच्या किमतीत विविध राज्यांमध्ये लक्षणीयरीत्या चढ-उतार होऊ शकतात. यामुळं अनेकदा खरेदीदार आणि विक्रेते दोघांसाठी गोंधळ आणि गैरसोय होते. सोने खरेदी हा भारतीयांसाठी विशेषत: महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा विषय असतो. सणाबरोबरच विविध आनंदाच्या प्रसंगी सोने परिधान केले जाते. त्यामुळे भारतात सोने खरेदीचे प्रमाण लक्षणीय आहे. कर, वाहतूक खर्च, स्थानिक मागणी आणि सरकारी धोरणांसह अनेक कारणांमुळं सोन्याची किंमत राज्यानुसार बदलते. कमी कर आणि मजबूत बाजारातील स्पर्धा असलेल्या राज्यांमध्ये उच्च कर आणि मर्यादित बाजारातील स्पर्धा असलेल्या राज्यांपेक्षा सोन्याच्या किमती कमी आहेत. सोन्याच्या विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी राज्यांमध्ये 'एक देश, एक दर' धोरण लागू करण्याच्या उद्देशाने ज्वेलरी उद्योग एकत्र आला आहे. यामुळे देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातून एकाच दराने सोन्याची विक्री केली जाईल. इंडियन ज्वेलर्स अँड बुलियन असोसिएशन ऑफ इंडिया तसेच ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल या दोन्ही प्रमुख संघटनांनी याबाबत चर्चा, विचारविनिमय करून ही मागणी केली आहे. भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सोन्याचा सर्वात मोठा ग्राहक आहे. दरवर्षी साधारणपणे ८०० टन सोन्याच्या मागणीला संपूर्ण भारतातून पुरठा होत असतो. या सोन्याचा अधिकृत दर कसा ठरवला जातो किंवा त्याची कशाशी तुलना करावी याबाबत ग्राहक वर्ग अनभिज्ञ आहे.



सोन्याच्या दराची राज्यनिहाय स्थिती भारत हा जगातील सोने खरेदीचा सर्वात मोठा ग्राहक आहे. सध्या भारतातील सोन्याचा दर हा अमेरिकेन डॉलरवर अवलंबून आहे. डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया वधारला किंवा घसरला तर आपल्याकडे सोन्याचे भाव कमी जास्त होत राहतात. परंतु देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये सोन्याच्या किमती बदलतात. महाराष्ट्र, केरळ, राजस्थान किंवा इतर कोणत्याही राज्यात सोन्याचा भाव पाहिला तर सर्वत्र किंमती वेगवेगळ्या असतात. प्रत्येक शहरातील स्थानिक बाजारपेठेतील परिस्थिती हा याचा सर्वात मोठा घटक आहे. सोन्याची मागणी आणि पुरवठा तसंच इतर स्थानिक आर्थिक घटकदेखील सोन्याचे दर ठरवण्यात भूमिका बजावतात. याव्यतिरिक्त, प्रत्येक शहरात स्वतःचे सोनार आणि ज्वेलर्स यांचे दर वेगवेगळे असतात. ते त्यांच्या कारागिरीसाठी वेगवेगळे शुल्क आकारू शकतात. सध्या सोन्याचा २४ कॅरेट सोन्याचा दर दहा ग्रॅमसाठी ७० हजार रुपयांच्या घरात आहे. राजधानीत याच सोन्याचा दर ६९ हजार ८७० रुपये आहे तर चेन्नईमध्ये हीच किंमत ७० हजार २०० रुपये आहे. पुण्या मुंबईमध्येसुद्धा दररोजच्या सोन्याच्या दरामध्ये चांगलाच फरक पडतो. संसदेमध्ये सादर झालेल्या अंदाजपत्रकात सोन्यावरील आयात शुल्क कमी केल्यामुळे त्याचा भाव झटक्यात खाली आला आहे. अलीकडे सोन्याच्या दरातील हेलकावे खूप लक्षणीय आहेत. लग्नाचा हंगाम लवकर सुरू होणार असल्यामुळे या मागणीत वाढ सातत्याने होत असून मागणी वाढली की निश्चितच दरामध्ये वाढ होणे हे अपरिहार्य आहे. येत्या दिवाळीपर्यंत सोन्याचे दर पुन्हा वर जातील असा जाणकारांचा अंदाज आहे. वाहतूक खर्च भारत हा सोन्याच्या मोठ्या आयातदारांपैकी एक आहे. सोन्याचा वाहतूक खर्च जास्त असून वाहतूक खर्चामध्ये इंधन, वाहनं, सुरक्षा इत्यादींचा समावेश होतो. तसंच तुम्ही सोनं घेत असलेल्या राज्य किंवा शहरानुसार वाहतुकीचा खर्च बदलू शकतो.

सोन्याचे प्रकार सोने २४ कॅरेट, २२ कॅरेट, १८ कॅरेट आणि १४ कॅरेटचे असू शकते. कॅरेट जितके जास्त असेल तितके सोने शुद्ध असेल आणि त्याचे मूल्यही जास्त असेल. 'एक देश, एक दर' धोरणाचे फायदे : 'एक देश, एक दर' धोरणामुळं ग्राहकांच्या आत्मविश्वासात वाढ होऊ शकते. सोन्याच्या किमती प्रमाणित केल्या जातात, तेव्हा प्रादेशिक किमतीतील फरकांमुळं अधिक पैसे देण्याची चिंता न करता ग्राहक खरेदीचे निर्णय घेऊ शकतात. ग्राहकांना एक विश्वासार्ह मालमत्ता म्हणून सोन्यात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळेल. देशभरात धोरणाची अंमलबजावणी झाल्यानं भारताच्या सुवर्ण उद्योगालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. पारदर्शक आणि वाजवी किंमत प्रणालीमुळं, सोन्याच्या बाजारात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांचा सहभाग वाढू शकतो. यामुळं सोन्याची मागणी वाढू शकते. मागणी वाढल्यानं खाण कामगार, रिफायनर्स आणि किरकोळ विक्रेत्यांना फायदा होईल. भारतातील सुवर्ण उद्योगाच्या एकूण वाढीस चालना मिळू शकते. छोट्या व्यावसायिकांना फटका 'एक देश, एक दर'मुळे सोन्याच्या व्यापारात पारदर्शकता येणार असली तरी त्याचे काही विपरीत परिणाम या व्यवसायावर होण्याची शक्यता आहे. सर्वात मोठा धोका म्हणजे प्रत्येक गावांमध्ये किंवा शहरांमध्ये असलेल्या छोट्या व्यावसायिकांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. या सर्वांना शहरातील किंवा गावातील मोठ्या व्यापाऱ्यांच्या स्पर्धेमध्ये उतरावे लागणार असून त्यांचा टिकाव लागणार नाही. देशातील सर्व मोठे व्यावसायिक किंवा मोठ्या कंपन्या या आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहार करतात व कमी किमतीला देशात सोने आयात करतात. त्यांच्या स्पर्धेमध्ये छोटे व्यापारी टिकू शकणार नाहीत व त्यामुळे अनेकांना व्यवसाय बंद करावे लागतील, तर काही जणांच्या यावर अवलंबून असलेल्या नोकऱ्या जाण्याची शक्यता आहे. एकच दर राहिल्यामुळे छोट्या-मोठ्या व्यापाराला मिळणारा नफा कमी होणार आहे. नफा क्षमता कमी झाली तर व्यवसायात टिकून राहणे व व्यवसाय करणे अवघड जाणार आहे. एक दर झाल्यामुळे त्यांच्या धंद्यावर किंवा व्यवसायावर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपुरा पुरवठा महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशभरात सगळ्या व्यापाऱ्यांना होणारा सोन्याचा पुरवठा सारख्या प्रमाणात राहणार नाही व त्यात अपुरा पुरवठा होण्याची शक्यता जास्त आहे. एकच दर असल्यामुळे सर्वात मोठ्या पुरवठादाराकडून छोट्या दुकानदारांना खरेदी करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. त्याचा परिणाम सोने खरेदी करण्यासाठी वेळ आणि खर्च वाढेल. आव्हानात्मक देशाच्या विविध राज्यांमधील सोन्याच्या मागणी पुरवठ्याचा विचार केला तर त्यावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या व्यवसायातील आतबटट्याच्या व्यवहारांवर विपरीत परिणाम होणार आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या हेलकाव्यामुळेही त्याचा एक दर ठेवणे काहीसे आव्हानात्मक करणार आहे.

सक्षम नियंत्रकाची गरज देशाच्या सोने बाजारात हा दर एक ठेवण्याची वेळ आली तर त्याचे नियंत्रण किंवा त्यावर लक्ष ठेवण्याची प्रक्रिया ही स्वतंत्र अधिकृत नियंत्रकाकडे असण्याची नितांत गरज आहे. सोने चांदीच्या बाजारपेठेच्या हातात त्याचे नियंत्रण कोणत्याही परिस्थितीत देता कामा नये. शेअर बाजाराचे नियंत्रण सेबीकडे आहे, विमा उद्योगाचे नियंत्रण विमा प्राधिकरणाकडे आहे किंवा बँकिंग क्षेत्राचे नियंत्रण रिझर्व बँकेकडे आहे त्याप्रमाणे सोन्या-चांदीच्या बाजाराचे नियंत्रण एका स्वतंत्र नियंत्रकाकडे असणे तेवढेच आवश्यक आहे. केंद्र सरकारची भूमिका महत्वाची सध्या इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (आयबीजेए) यांच्याकडून दररोज दोनदा सोन्याचा दर ठरवला जातो. देशातील दहा मोठ्या सोन्याचांदीच्या पेढ्यांकडून त्यांची खरेदी विक्री किंवा मागणी पुरवठा लक्षात घेऊन हा दर जाहीर केला जातो. यातील बहुतेक सर्व पेढ्या सोन्याची परदेशातून नियमितपणे आयात करत असतात. त्यामुळे ते आंतरराष्ट्रीय सोन्याचा दर त्यांच्या किमती ठरवण्यासाठी पायाभूत दर म्हणून वापरतात. यामध्ये डॉलर रुपया विनिमयाचा दर आणि त्यावर वसूल केला जाणारा कर यावरून दर ठरतो. सध्याच्या पद्धतीवरून एक गोष्ट निश्चित लक्षात येऊ शकते ती म्हणजे सोन्याच्या दरामध्ये सातत्याने फेरफार व दुरुपयोग केला जातो यात शंका नाही. २०१३ मध्ये लंडनच्या बाजारात सोन्याच्या दराचा मोठा घोटाळा उघडकीस आला होता. त्यामुळे देशाच्या सोन्या-चांदीच्या बाजारपेठेत एका सक्षम नियंत्रकाची कायद्याद्वारे नेमणूक करून देशभरातील ग्राहकांना सोन्या चांदीचा वाजवी दर कसा मिळेल याकडे केंद्र सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.

# 'कांस्या'ची लंगोटी!

आपण खरोखरच किती पुढे सरकलो, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. तो करत असताना प्रथम एका फालतू सवयीचा त्याग करावा लागेल. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने अपेक्षेपेक्षा कमी अशी सहा पदके पटकावली आणि यंदा तर सुवर्णपदकानेही हुलकावणी दिल्यामुळे भारताचा क्रमांक ७१पर्यंत खाली घसरला. नीरज चोप्राचे एक रौप्यपदक आणि ५ कांस्यपदके ही कामगिरी टोक्यो २०२०च्या तुलनेत उजवी तर अजिबात म्हणता येणार नाही. किमान सहा प्रकारांमध्ये भारत चौथ्या क्रमांकावर राहिला, म्हणजे ती हुकलेली सहा कांस्यपदके ठरतात. कुस्तीमध्ये विनेश फोगटच्या वजनावरून घोळ झाला नसता, तर आणखी किमान रौप्यपदक मिळाले असते. आणि नीरज चोप्राला पाकिस्तानच्या अर्शद नदीमकडून अनपेक्षित स्पर्धा उभी राहिली नसती, तर भारताला सुवर्णपदकासह दोन आकडी पदकसंख्या गाठता आली असती आणि भारताचा क्रमांक पहिल्या पन्नासात तरी लागला असता. तांत्रिकदृष्ट्या पॅरिसमधील कामगिरी भारताची तिसरी सर्वश्रेष्ठ कामगिरी ठरते. टोक्यो ऑलिम्पिकमध्ये भारताने १ सुवर्ण, २ रौप्य आणि ४ कांस्य अशी सात पदकांची कमाई केली होती. तर लंडन २०१२मध्ये २ रौप्य आणि ४ कांस्य अशी सहा पदके भारताच्या नावापुढे नोंदवली गेली. त्यावेळी सहा आणि यंदाही सहा, मात्र त्यावेळी दोन रौप्यपदके होती. यंदा एकच रौप्यपदक आहे. त्यामुळे निव्वळ क्रमांकांच्या भाषेत बोलायचे झाल्यास भारताची ही सहा पदकांची कामगिरी अटलांटा १९९६ (१ कांस्य) आणि सिडनी २००० (१ कांस्य) या स्पर्धांच्या इतकीच मोलाची म्हणजे ७१व्या क्रमांकाची झाली. याचा अर्थ १९९६, २००० आणि २०२४ अशा तिन्ही स्पर्धांमध्ये भारत ७१व्या क्रमांकावर राहिला! त्या स्पर्धा आणि पॅरिस यांच्यात २५-३० वर्षांचा फरक आहे. पण 'मेडल इन्फ्लेशन'चा विचार करता, भारताच्या 'त्या' एकल पदकांइतकेच यंदाच्या अर्धा डझन पदकांचे मोल ठरते. तेव्हा आपण खरोखरच किती पुढे सरकलो, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. ते करत असताना प्रथम एका फालतू सवयीचा त्याग करावा लागेल. ही सवय अर्थातच तुलनेची. चीन, अमेरिका बघा किती पुढे गेलेत गेला बाजार आफ्रिकेतले देश बघा कशी कामगिरी करतात ते दूरचे देश सोडा, पण जपान-कोरियासारखे 'आशियाई' देश किती पदके मिळवतात ते तरी पाहा युक्रेनसारखा युद्धजर्जर देश पदके मिळवतो मग आम्हाला काय झाले पॅरिसमध्ये पहिल्या २० क्रमाकांच्या देशांवर नजर टाकली, तर उझबेकिस्तान, केनिया आणि ब्राझील वगळता सगळे देश हे श्रीमंत आणि पुढारलेले आहेत. चीन आज इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे क्रीडा क्षेत्रातही महासत्ता आहे. कारण कितीतरी क्रीडा प्रकारांमध्ये या देशाची गुंतवणूक आणि गुणवत्ता आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपिय देशांमध्ये वर्षानुवर्षे रुजलेली आणि जोपासलेली क्रीडा संस्कृती आहे. जपान-कोरिया हे देश वर्षानुवर्षांच्या प्रयत्नांती पहिल्या जगातले देश म्हणून वावरतात. शिवाय गेल्या तीन स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या कारणांस्तव रशियाचे खेळाडू उतरलेले नाहीत. अन्यथा त्यांनीही ढीगभर पदके मिळवली असती आणि कदाचित भारताचा क्रमांक अधिक खाली घसरला असता. चीन-रशियासारखा हुकूमशाही वरवंटा आपण चालवू शकत नाही. जपान-कोरियासारखी शिस्तबद्ध व्यवस्था आपण राबवू शकत नाही. अमेरिका, युरोप आणि आफ्रिकी



देशांप्रमाणे आपल्या पोषणात प्रथिनमूल्यांचे प्रमाण अत्युच्च नसते, त्यामुळे शारीरिक ठेवणीत मर्यादा येतात. मुद्दा असा, की या मर्यादा असूनही आपण सध्यापेक्षा उजवी कामगिरी करून दाखवू शकतो, याविषयी सर्वंकष गांभीर्याने विचारच होत नाही. यासाठी छोटी आणि मर्यादित उद्दिष्टे ठेवणे शिकावे लागेल. उदा. गतशतकात कोरियाने १९८६ आणि १९८८ असे अनुक्रमे आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद भूषवले. त्यावेळी आपण जपानपेक्षा अधिक पदके मिळवली पाहिजेत असे माफक उद्दिष्ट ठेवले गेले. आजही त्यात फार फरक पडलेला नाही. पण पहिल्या दहात जपानप्रमाणेच कोरियादेखील दिसतो. २०१२मध्ये ब्रिटनने ऑलिम्पिक यजमानपद भूषवले, त्यावेळी इतर कोणत्याही देशांऐवजी ऑस्ट्रेलियापेक्षा अधिक पदके जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. २०१२ ते २०२० अशा सलग तीन स्पर्धांमध्ये ब्रिटनने ऑस्ट्रेलियापेक्षा सरस कामगिरी करून दाखवली. यंदा ऑस्ट्रेलियाच्या नावावर अधिक सुवर्णपदके नोंदवली गेल्यामुळे त्यांचा क्रमांर वर सरकला. पण एकूण पदके ब्रिटननेच अधिक जिंकली. आपण ब्रिटन किंवा कोरियाप्रमाणे एखाद्या देशाला लक्ष्य ठेवून कामगिरी सुधारावी अशी स्थिती नाही. पण मर्यादित क्रीडाप्रकारांवर लक्ष केंद्रित करून पदक जिंकण्याची क्षमता आणि शक्यता वाढवणे का जमू नये? स्वतंत्र भारताने केवळ आठ क्रीडाप्रकारांमध्ये आजवर पदके जिंकली आहेत. ते आहेत - हॉकी, कुस्ती, टेनिस, वेटलिफ्टिंग, नेमबाजी, बॉक्सिंग, बॅडमिंटन, अॅथलेटिक्स. यांतील टेनिसमध्ये पदक जिंकण्याची शक्यता नजीकच्या काळात शून्य. अॅथलेटिक्समध्येही नीरज चोप्रा वगळता इतरांकडून पदकांची अपेक्षाही ठेवणे अशक्य आहे. तिरंदाजी आणि टेबल टेनिसमध्ये आपण उपान्त्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचतो, पण पदक जिंकणे जमलेले नाही. बाकीच्या खेळांबाबत तर तेही दिसून येत नाही. यंदा ११७ जणांचे जंगी पथक आपण पाठवले. हा थाट कशासाठी आणि कोणासाठी? ही अशी पथके राष्ट्रकुल आणि आशियाई स्पर्धांसाठी खुशाल पाठवावीत. या दोन्ही स्पर्धांमध्ये आपण गेली काही वर्षे पदकांचे विक्रम रचत आहोत. पण ते यश ऑलिम्पिकमध्ये परिवर्तित होत नाही हे वास्तव आहे. याबाबतीत फार दूरवर पाहायला नको. इराण, मंगोलिया, इंडोनेशिया हे देश मोजक्याच क्रीडा प्रकारांवर लक्ष केंद्रित करतात आणि सुवर्णपदक किंवा सुवर्णपदके जिंकून आणतात. मग आपणच कशासाठी उगीच दहा सुवर्णपदके जिंकून आणतील अशा थाटात जंबो पथके पाठवायची याविषयी गांभीर्याने विचार करायलाच हवा. नेमबाजांचे सध्या रास्त कौतुक होतेय, पण आधीच्या दोन स्पर्धांमध्ये आपली या खेळातली पाटी कोरी होती. यंदा बॉक्सिंग आणि बॅडमिंटनच्या बाबतीत हे घडले. कुस्तीच्या शेवटच्या दिवशी एक कांस्यपदक हाती लागले. म्हणजे आहे त्या खेळांमध्ये पदके राखताना जीव मेटाकुटीला येतोय. वेटलिफ्टिंगमध्ये २००० आणि २०२०मध्ये पदक मिळाले, ते यंदा नाही. नीरज चोप्राला आता प्रत्येक स्पर्धेत पाकिस्तानच्या नदीमकडून कडवी स्पर्धा मिळणार, तेव्हा त्याच्या सुवर्णपदकाची हमी नाही. अभिनव बिंद्रा आणि नीरज चोप्रा यांच्याव्यतिरिक्त सुवर्णपदक तरी कसे मिळणार याचा विचार कधी कोणी करते का? तो प्रयत्न कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन, बॉक्सिंग अशा मोजक्या खेळांमध्येच दिसून यायला हवा. हॉकीमध्ये सुवर्णपदक मिळू शकेल, असे आश्वासक सातत्य भारताने दाखवले आहे. इतर खेळांमध्ये ते दिसून यायचे असेल, तर मोजक्याच खेळांवर ऑलिम्पिकपुरते लक्ष केंद्रित करावे लागेल. यासाठी फार तर सहा खेळ आणि ५० जणांचे पथक इतका जामानिमा पुरेसा आहे. नाही तर काही मीटरांचे कापड घेऊन जायचे आणि लंगोटीच नेसून परतायचे असा प्रकार सतत दिसत राहील. भारताने तुलना भारताशीच करावी. यशही दिसेल आणि फाजील अपेक्षाभंगाचे दुःखही कमी होईल. अन्यथा मग आहेच दर वेळी कांस्यपदकांची लंगोटी नि तिला एखादे सोनेरी किंवा रुपेरी ठिगळ!

# ' कास्ट्राईब ' च्या मागण्या मान्य करण्यासाठी धरणे आंदोलन विविध संघटनांचा आंदोलनास पाठिंबा मागण्या मान्य करण्याचे शासनाला साकडे जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा सर्व संघटनांचा आग्रह.







लातूर :- राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तत्काळ लागू करणे, जुनी पेन्शन योजना तत्काळ प्रभावासह लागू करावी, रिक्त पदे तात्काळ भरावीत आणि राज्यातील कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करावे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परदेश शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती उत्पन्न मर्यादा ८ लाखा ऐवजी १५ लाख करण्यात यावी आदी मागण्यांकडे वारंवार धरणे आंदोलने करुनही शासनाने दुर्लक्ष केले. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. मागण्या मान्य न झाल्यास आझाद मैदान, मुंबई येथे तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष कृष्णा इंगळे, कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भूईगळ यांच्या आदेशानुसार लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, आंदोलन करुन जिल्हा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी यांनी मागण्यांचे निवेदन (१३ रोजी) दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, कास्ट्राईब शिक्षक संघटना अध्यक्ष सुभाष मस्के, जिल्हा परिषद कास्ट्राईब कर्मचारी संघटना विंगचे अध्यक्ष ओंकार वंजारे, कास्ट्रईब महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डी.आर.सूर्यवंशी, कास्ट्राईब दिव्यांग विभाग शिक्षक व कर्मचारी संघटनेचे मराठवाडा विभाग अध्यक्ष गिरिष तुबाजी ( निलंगेकर) आणि कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या धरणे आंदोलनास जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष एम.एन.पांचाळ, जिल्हा निमंत्रक तथा मराठवाडा शिक्षक संघ जिल्हा सचिव जी.व्ही.माने. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना लातूर जिल्हा जिल्हाध्यक्ष तानाजी सोमवंशी, क्रांती शिक्षक संघटना विभागीय अध्यक्ष अण्णासाहेब नरसिंगे, आदर्श शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष लक्ष्मण दावणकर, अखिल प्राथमिक शिक्षक संघटना सुनिल हाके यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. यावेळी शिक्षक नेते सुनिल हाके, सुभाष मस्के, अशोक माळगे, ओंकार वंजारे, पी,एस.नरसिंगे, दत्तात्रय सुर्यवंशी यांची आंदोलना मागील रुपरेषा सांगून धरणे आंदोलन किती महत्वाचे आहे याबाबतचे मार्गदर्शनपर भाषणे झाली. कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, कास्ट्राईब महसूल कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद कर्मचारी संघटना, कास्ट्राईब तलाठी कर्मचारी संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, माहिती व जनसंपर्क कर्मचारी संघटना, कास्ट्राईब कर्मचारी जलसंपदा संघटनांनी सहभाग घेऊन धरणे व आंदोलन यशस्वीतेसाठी केले. यावेळी सुधीर बोकीफोडे, राहूल बनाटे, जी.एल. सुरवसे, अनुराधा सगर, कवळीकर एस.एस., अनिता हुडे, रामकिसन तोकले, बालाजी केंद्रे, सीमा तांदळे, स्वाती ढोणे, सौ. एस.आय. शेळके, सुरेखा जाधव यांच्यासह कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महसूल,शिक्षक, जिल्हा परिषद अशा विविध संघटनांच्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## हाडांचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी कपभर सुक्या खोबऱ्याचा वापर करून बनवा पौष्टीक लाडू

आहारामध्ये कॅल्शियम किंवा प्रोटीनची कमतरता निर्माण झाल्यानंतर कमी वयातच हाडांचे दुखणे चालू होते. हाड दुखणे, सांधे दुखणे, स्नायू दुखणे इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात. या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार घेतले जातात. औषध घेईपर्यंतच हाडांचे दुखणे थांबते मात्र औषध बंद केल्यानंतर पुन्हा एकदा स्नायूचे दुखणे सुरु होते. या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात योग्य त्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. जीवनशैलीमध्ये बदल झाल्यानंतर हळूहळू आरोग्य बिघडण्यास सुरुवात होते. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात पौष्टीक पदार्थांचे सेवन करावे. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला एक कप सुक्या खोबऱ्याचा वापर करून पौष्टिक लाडू कसे बनवायचे याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हे लाडू तुम्ही नक्की बनवून पहा.साहित्य: सुकं खोबर काजू बदाम मनुके खजूर वेलची पावडर कृती: सुक्या खोबऱ्याचा वापर करून लाडू बनवण्यासाठी सर्वप्रथम एक वाटी सुक खोबर घेऊन ते बारीक किसून किंवा मिक्सरमधून बारीक करून घ्या. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात काजू, बदाम, खजूर टाकून पुन्हा एकदा जाड बारिक वाटून घ्या. त्यानंतर खोबऱ्याच्या मिश्रणामध्ये बारीक वाटलेले काजू बदाम टाकून मिक्स करून घ्या. तसेच वेलची पावडर सुद्धा मिक्स करा. हे सर्व साहित्य मिक्स करून झाल्यानंतर हाताच्या सहाय्याने लाडू वळून घ्या. तयार केलेले लाडू बंद डब्यात ठेवून तुम्ही स्टोर करू शकता. हे लाडू खाल्ल्यामुळे हांडाचे दुखणे कमी होऊन आरोग्य सुधारेल.

### लवादा समक्ष
### जाहीर नोटीस

**(बहु-राज्यीय सहकारी संस्था कायदा २००२च्या कलम ८४ अन्वये)**
द्वारा आबासाहेब मल्टी स्टेट मल्टी परपज को.ऑफ.सोसायटी लिमिटेड
मु.पोस्ट दहिवडी तालुका माण जिल्हा सातारा पिन नं ४१५५०८

**ज्याअर्थी आबासाहेब मल्टी स्टेट मल्टी परपज को.ऑफ.सोसायटी लिमिटेड,** यांनी वादी या नात्याने खाली नमूद केलेले वाद माझ्याकडे निर्णय देण्याकरिता सोपविले आहेत् त्याअर्थी मी याद्वारे दि. ०२ सप्टेंबर २०२४ रोजी स. ११.३० वाजता श्री गणेश सोसायटी शॉप नं १२ सेक्टर २८ नेरूळ नवी मुंबई ४००७०६ या पत्यावर स्वता ः प्रतिवादी किंवा योग्यरित्या सूचना दिलेला लवादी प्रकरणाशी संबंधित सर्व आवश्यक प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल असा अधिकृत वकील यांच्या द्वारे माझ्या समक्ष उपस्थित राहण्याचे आणि त्यानंतर सदर प्रकरणातील दाव्यांवर उत्तरे देण्याचे आदेश देत आहे.

| अ.क | विवाद/ प्रकरण क |
| --- | --- |
| १ | **ARB/ABASAHEB MSMP/SPK/ 004** आबासाहेब मल्टी स्टेट मल्टी परपज को.ऑफ.सोसायटी लिमिटेड ------ **वादी**<br>**विरूद्ध**<br>**१ वसंत बंडू केसरे**<br>**एन एल २ बिल्डींग नं ४ रूम नंबर अे ६ सेक्टर ३ नेरूळ नवी मुंबई ४००७०६---- प्रतिवादी १**<br>**२ विजय दशरथ दळवी**<br>**मु पोस्ट चिकलगाव तालुका अकोला जिल्हा अकोला पिन नं.४४४३०२ --- प्रतिवादी २** |

